वाचा :- जा.क्र.मावि-१/२००६-०७/१३४६/५१, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद विभाग औरंगाबाद. दिनांक :- १४.७.२००६

१. मातोश्री तुलसी शिक्षण संस्था सिल्लोड जि.औरंगाबाद यांचा ठराव क्रमांक २ दिनांक ७.११.२००५.

२. सौ.गंधारीबाई प्रतिष्ठाण सिडको, औरंगाबाद यांचा टराव क्र.४ दि.१०.११.२००५

३. शिक्षणाधिकारी (मा.) जि.प.औरंगाबाद यांचे प.क्र.जिपऔ/मावि-६/२००५-०६/दिनांक २८.११.२००५.

४. मा.शिक्षण उपसंचालक औरंगाबाद यांच्या दालनात झालेली सुनावणी दिनांक १०.७.२००६.

विषय :-मातोश्री तुलसी शिक्षण प्रसारक मंडळ सिल्लोड या संस्थेची माध्यमिक विद्यालय ओहर ता.जि.औरंगाबाद ही कायम विनाअनुदानीत शाळा सौ.गंधारीबाई प्रतिष्ठाण औरंगाबाद, जि.औरंगाबाद या सस्थेस कायमस्वरुपी हस्तांतरीत करणे बाबत.

जा.क्र.मावि-६/२००६-०७
जि.प.औ/शिक्षण/मावि-६
दि. २१/०७/२००७

<u>कार्यालयीन आदेश</u>

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रान्वये मा.शिक्षण उपसंचालक औरंगाबद यांनी मातोश्री शिक्षण प्रसारक मंडळ सिल्लोड या संस्थेची माध्यमिक विद्यालय ओहर ता.जि.औरंगाबाद ही कायम विनाअनुदानीत शाळा सौ.गंधारीबाई प्रतिष्ठाण औरंगाबाद, ता.जि.औरंगाबाद या संस्थेस कायमस्वरुपी हस्तांतरीत करण्यास शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून खालील अटींच्या आधीन राहून परवानगी देण्यात येते.

१. सौ.गंधारीबाई प्रतिष्ठाण, औरंगाबाद ता.जि.औरंगाबाद या संस्थेस माध्यमिक शाळा संहिता नियम आणि महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियम १९८१ चे पालन करणे बंधनकारक राहील.

२. मातोश्री तुलसी शिक्षण प्रसारक मंडळ सिल्लोड ही संस्था सदरील शाळेतील सर्व शालेय अभिलेख त्याच प्रमाणे माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे सर्व प्रकारच्या नोंद वहया, साधन सामुग्री सौ.गंधारीबाई प्रतिष्ठाण सिडको, औरंगाबाद या संस्थेकडे हस्तांतरीत करील.

३. मातोश्री तुलसी शिक्षण प्रसारक मंडळ सिल्लोड संचलित माध्यमिक विद्यालय ओहर ता.जि.औरंगाबाद या शाळेतील वर्ग चालविण्यासाठी आवश्यक त्या सोई/सुविधा सौ. गंधारीबाई प्रतिष्ठण सिडको, औरंगाबाद या संस्थेने उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. तसेच नियुक्ती केलेल्या शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

४. माध्यमिक विद्यालय ओहर ता. जि. औरंगाबाद ही शाळा हस्तांतरीत करण्यापूर्वी आर्थिक व्यवहार व इतर काही बाबतीत शासनाकडून काही अपेक्षा अथवा वसुली सुचविल्यास त्यांची जबाबदारी मातोश्री शिक्षण प्रसारक मंडळ सिल्लोड ता. जि. औरंगाबाद या संस्थेवर राहील.

**शिक्षणाधिकारी (माध्यमिक)**
**जिल्हा परिषद औरंगाबाद**

प्रति माहितीस्तव सादर :-

१. मा.अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रतिलिपी-योग्यता कार्यवाहीस्तव

१. अध्यक्ष/सचिव, मातोश्री तुलसी शिक्षण प्रसारक मंडळ सिल्लोड, ता.जि.औरंगाबाद.

२. अध्यक्ष/सचिव, सौ.गंधारीबाई प्रतिष्ठाण, औरंगाबाद, ता.जि.औरंगाबाद.

३. मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय ओहर, ता.जि.औरंगाबाद.